## 3.4.3- Awards & Recognitions received for Extension & Outreach Activities-

Gulabrao Patil homoeopathic Medical College, Miraj situated in the heart of city, is a medical institute for 30 years. Miraj, known as the center for medical facilities has a history of more than 100 years of serving the mankind. As an institute we are privileged to be a part of this city. Our Institute under the able leadership of Hon. Chairman Prithviraj Patil sir, has being working for social causes through our NSS unit since the establishment of our Institute along with providing good medical facilities. During the last 5 years, various natural calamities like floods and medical emergencies like the pandemic of Covid 19 hit the district of Sangli and the whole nation in general. We, as an institute have witnessed it all and proudly acclaim that we were able to serve the people of our district by actively engaging ourselves in these activities. Sangli District suffered a lot twice during the floods of 2019 & 2021. We, along with our students actively volunteered in mobilization of the affected people to their shelter homes & provided them proper medical aid by distribution of medicines. A door-to-door survey and visit was done by the students of our institute during the Floods of 2019, to provide medicinal aid and to give moral and emotional support. Still not recovered from the mental trauma of Floods, our whole nation witnessed the most disastrous Pandemic of Covid 19. Our Institute again provided a humanitarian hand towards the suffering humanity by arranging Fever camps, providing medicinal aids, distribution of masks and sanitizers for the prevention of spread of this Pandemic. Arsenicum album, as a genius for the prevention of the pandemic Covid 19 was distributed freely to various villages from Sangli District by the staff and students & Interns of our institute by risking their own lives. Similar aid was again provided during the second wave of covid 19 pandemic, our students and staff members visited the Covid positive patients, who were in isolation and distributed the medicinal kit to them free of charge, on humanitarian grounds. All this work was acknowledged by the Government authorities and was done in collaboration with PHC's. These are a few examples, our Institute has been actively engaged in various outreach and extension activities through our NSS unit also like Blood Donation Camps, Tree Plantation, Health & Hygiene Awareness Camps, arranging various lectures and investigation camps, Homoeopathic Camps etc. We are also a part of Swachh Bharat and Unnat Bharat Abhiyaan. The media has taken the note our activities and our Institute received a lot of appreciation & blessings from the common people but as we were devoted for this philanthropic work, never anticipated any awards and recognitions from Government and Non-Government agencies. Our appreciation from the common people was the biggest award we achieved and the exposure which media provided by writing various articles, exposing our work was the only appreciation we received.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE ● MIRAJ ● R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/9/1991

Principal
Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.




795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

Gulabrao Patil
Hospital, Miraj

CELEBRATING SILVER JUBILEE
Estd. 1992
GPMT
Gulabrao Patil Memorial Trust
Founder Hon'ble Prithviraj Patil

Ref. No. : GPHMC/2020-21/612

Date : 29/04/2021

प्रति,

मा.आयुक्त,

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका,

सांगली

विषय–गुलाबराव पाटील हॉस्पिटल, मिरज, सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका व पृथ्वीराज पाटील फौंडेशन,सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने गृह अलगीकरण कोवीड रूग्णांची तपासणी व औषधोपचार उपक्रम राबविणेस परवानगी मिळणेबाबत...

मा.महोदय,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड पेशंटचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामध्ये गृह अलगीकरण रूग्णांची संख्या खूप मोठया प्रमाणात वाढत आहे, सामाजिक बांधिलकी म्हणून यापूर्वी महापूरामध्ये व गेल्या वर्षीच्या कोरोनामध्ये आमच्या संस्थेच्या होमिओपॅथिक महाविद्यालयाचे डॉक्टर्स, इंटर्नस , विद्यार्थी व नर्सिग महाविद्यालयाचे नर्सेस, विद्यार्थी यांनी फिरत्या तापाच्या दवाखान्याच्या माध्यमातून व महापुरामध्ये घरोघरी जावून नागरिकांची तपासणी व मोफत औषधोपचार केले होते. पुन्हा कोरोनाशी मुकाबला करण्यात व नागरिकांना आरोग्य सेवा देण्यात आम्ही सज्ज आहोत. सदरचा उपक्रम आम्ही पृथ्वीराज पाटील फौंडेशन, सांगली यांच्या सहकार्यातून गुलाबराव पाटील हॉस्पिटल, मिरज व सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका असा संयुक्त विद्यमाने राबविणार आहोत. त्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात गृह अलगीकरणामध्ये असलेल्या रूग्णांची तपासणी व मोफत औषधोपचार व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणा–या औषधांचे मोफत वितरण आमच्या संस्थेमधील डॉक्टर्स ,परिचारिका व इंटर्न विद्यार्थी यांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या वेगवेगळया आरोग्यकेंद्र निहाय सेवा देणेचे नियोजन करण्यात आले आहे त्याचा तपशिल सोबत जोडला आहे.तरी सदरचा उपक्रम राबविणेसाठी आपण मान्यता द्यावी ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक,

गुलाबराव पाटील हॉस्पिटल

GULABRAO PATIL HOSPITAL MIRAJ Reg. No. 159

PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE R. No. MED/1291/910/CR/410/91 MED-7 /1991

**Principal**
**Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.**

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2226376 Telefax : 0233 - 2212147
Web site : www.gpmthmc.org

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

Ref. No. :

Date :

॥ ज्ञानमेव गुरुः ॥

GPMT
Gulabrao Patil Memorial Trust


**हॅलो प्रभात**

# गुलाबराव पाटील हॉस्पिटलची आरोग्य पथके पूरग्रस्त भागात तैनात

## काँग्रेस, पृथ्वीराज पाटील फौंडेशन तर्फे शहरात मदतकार्य

सांगली : हॅलो प्रभात

सांगली शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. पृथ्वीराज पाटील यांनी आज महानगरपालिका शाळांमधील पुरग्रस्त निवारा केंद्रांना भेटी दिल्या. तेथील नागरीकांनी आरोग्य सुविधांची मागणी केली. त्यानुसार गुलाबराव पाटील होमिओपॅथिक हॉस्पीटलची आरोग्य पथके या केंद्रांवर कार्यरत ठेवण्यात आली आहेत. पुरग्रस्तांसाठी आरोग्य सेवा अत्यंत महत्वाची असल्यामुळे ही सोय करण्यात आली आहे. इनामधामणी येथे श्री. पाटील यांनी आज सकाळी भेट दिली आणि तेथील सुविधांची पाहणी केली.



सांगली शहर जिल्हा काँग्रेस आणि पृथ्वीराज पाटील फौंडेशनच्या वतीने पुरग्रस्त भागात मदतकार्य वेगाने चालू ठेवले आहे. टिळक चौक, गावभाग, मारुती रोड या भागात दुध, बिस्कीटे व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. आवश्यक तेथे मदतकार्य करण्यात आले. शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी विविध भागात जावून पुरग्रस्त लोकांच्या भेटी घेतल्या आणि विचारपूस केली.

महापुराच्या तडाख्यात सापडलेल्या जनावरांची उपासमार होत होती. मार्केट यार्डात निवा-यासाठी आणलेल्या जनावरांना फौंडेशन तर्फे चारा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली. शहर आणि भागातील काही लोकांनी या जनावरांसाठी या माणुसकीचा हात पुढे केला आहे.


Main Edition
27 July, 2021 Page No. 1
Powered by : erelego.com


H

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No.
MED/1291/910/
CR/110/91
MED-7
Dt. 21/9/1991
MIRAJ

Principal
Gulabrao Patil Homoeopathic
Medical College, Miraj.


Recognised by Govt. of Maharashtra and Central Council of Homoeopathy New Delhi. Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Tel.: 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



सांगली : प्रतिनिधी

होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन प्रतीक्षा काळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या शिबिरामध्ये डॉ. जिनेश्वर, डॉ. अनिता नातू, डॉ. राजेंद्र नेते, डॉ. प्रसाद भोसले या तज्ञ टीम द्वारे तपासणी करण्यात आली. व तसेच मोफत सॅनिटायझर, औषधे यांचे वाटप करण्यात आले.

तसेच अंबुताई मेहेंदळे यांच्या मुलींच्या वसतीगृहा मध्ये तपासणी व औषधांचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या गरजेच्या वस्तूंची वाटप करण्यात येईल असे आश्वासन मा. पृथ्वीराज बाबा पाटील यांनी दिले.

तसेच या सर्व कार्यक्रमांसाठी वार्ड क्रमांक १६ मधील तौफीक शिकलगार, कु. प्रथमा काळे, डॉ. टीम, नगरपालिकेचे कर्मचारी या सगळ्यांचा आभारी आहे. पृथ्वीराज बाबा पाटील टिम - डॉ. जिनेश्वर यलिगौडासर, डॉ. अनिता नातू प्रभाग क्रमांक १६ तर्फे सर्व नागरीकडून मनःपूर्वक आभार.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC ME... R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/9/1991 MIRAJ.

**Principal**
Gulabrao Patil Homoeopathi
Medical College, Miraj.

Gulabrao Patil
Homoeopathic
Medical College, Miraj

Ref. No. :

Date :

।। ज्ञानमेव गुरुः।।
GPMT
Gulabrao Patil
Memorial Trust

# आरोग्य सेवा दारोदारी उपक्रमातगत फिरता दवाखाना सुरू

मिरज : प्रतिनिधी

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका व गुलाबराव पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने (आरोग्य सेवा दारोदारी) उपक्रमांतर्गत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला व मिरजेतील लोंढे कॉलनी येथील रुग्णांची तपासणी करण्यात आली.



यावेळी माजी महापौर किशोर दादा जामदार, नगरसेवक संजय मेंढे, नगरसेविका बबिता मेंढे, सा . मि . कु . महानगरपालिका उपायुक्त स्मृती पाटील, डॉ. विनोद परमशेट्टी, माजी नगरसेवक अजित दोरकर, आरोग्य अधिकारी विजय आंबेळे, चंद्रकांत आंबी, सचिन जाधव, कुपवाड शहर काँग्रेसचे अध्यक्ष सनी धोतरे, मिरज शहर युवक काँग्रेस अध्यक्ष आयुब निशाणदार, माजी उपमहापौर प्राचार्य डॉ. राजेंद्र मेथे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ डीन डॉ. प्रताप भोसले उपस्थित होते.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No.
MED/1291/910/
CR/110/91
MED-7
Dt. 21/9/1991
MIRAJ.

Principal
Gulabrao Patil Homoeopathic
Medical College, Miraj.

Recognised by Govt. of Maharashtra, and Central Council of Homoeopathy New Delhi, Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

Ref. No. :

Date :

GPMT
Gulabrao Patil Memorial Trust



## गुलाबराव पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमध्ये एड्स जनजागृती सप्ताह साजरा

**। ललकार वृत्त ।**

मिरज दि. ३ (वार्ताहर) – गुलाबराव पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, मिरज येथे एड्स जनजागृती सप्ताह अंतर्गत गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष पृथ्वीराज पाटील, विश्वस्त ड. विरेंद्रसिंह पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र मेथे, उपप्राचार्य डॉ. सुहास पाटील आणि कम्युनिटी मेडिसीन चे एचओडी डॉ. शितलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये आय. सी. टी. सी. विभागाचे प्रमुख सलिम मुल्ला, संजिवनी विभुते आणि नंदा कांबळे यांचे समुपदेशन लाभले.

'होमिओपॅथी एड्सवर गुणकारी' या विषयावर डॉ. संजय पाटील यांच्याशी परिसंवाद साधला. एड्स विरोधी जनजागृती विषयावर चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी संदेशपर पथनाट्य सादर केले.

जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध कक्षांतर्गत पोस्टर स्पर्धेत शर्वरी राबाडे हिला प्रथम तर साक्षी दरक हिला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले, तसेच नाझिया देसाई हिला कॉलेज स्तरावर पोस्टर स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, अंतर्वासिता आणि प्राध्यापक उपस्थित होते.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE, MIRAJ. R. No. MED/1291/910/CR/110/91 MED-7 Dt. 21/9/1991

Principal
Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.

Recognised by Govt. of Maharashtra, Central Council of Homoeopathy New Delhi, Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

।। ज्ञानमेव गुरुः ।।
GPMT
Gulabrao Patil Memorial Trust

Ref. No. :

Date :



शनिवार १ मे एप्रिल २०२१ दैनिक बंधुता


## गुलाबराव पाटील हॉस्पिटल, महापालिका, पृथ्वीराज पाटील फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

सांगली, दि. ३० : कोविड काळात गृहअलगीकरणातील रुग्णांची मोफत तपासणी आणि औषधोपचारासाठी गुलाबराव पाटील हॉस्पिटल, मिरज; सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका आणि पृथ्वीराज पाटील फाउंडेशन, सांगली यांच्यावतीने संयुक्त उपक्रम आजपासून सुरू करण्यात आला. काँग्रेसचे सांगली शहर जिल्हाध्यक्ष श्री. पृथ्वीराज पाटील आणि आयुक्त श्री. नितीन कापडणीस, महापौर दिग्विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत त्रिमूर्ती कॉलनी, हनुमाननगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सकाळी या उपक्रमाचे उद्घाटन झाले.



यावेळी श्री. पृथ्वीराज पाटील म्हणाले, आयुक्त कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रात कोरोना विरुद्धचा लढा सुरू आहे. त्यासाठी त्यांना मदत करण्याच्यादृष्टीने आम्ही चर्चा केली. गुलाबराव पाटील हॉस्पिटल तसेच पृथ्वीराज पाटील फाउंडेशनच्यावतीने मदत करण्याची तयारी दर्शवली. सांगली आणि मिरज येथील दहा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये या सुविधा दिल्या जाणार आहेत. गुलाबराव पाटील हॉस्पिटलमधील ७० जणांची टीम त्यासाठी कार्यरत राहणार आहे. २१ डॉक्टर्स, २० नर्सेस, १० सपोर्टिंग स्टाफ आणि काही इंटर्नस विद्यार्थी त्यामध्ये सहभागी होणार आहेत.

ते म्हणाले, गृहअलगीकरण झालेल्या महापालिका क्षेत्रातील रुग्णांची घरोघरी जाऊन तपासणी आणि मोफत औषधोपचार ही टीम करणार आहे. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी व्हिटॅमिन सी, झिंकच्या गोळ्या आणि आर्सेनिक अल्बम - ३० या औषधांचे कुटुंबीयांसाठी होमकिट मोफत दिले जाणार आहे.

ते म्हणाले, महापुराच्या वेळी गुलाबराव पाटील हॉस्पिटल आणि पृथ्वीराज पाटील फाउंडेशनच्यावतीने नागरिकांची आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचाराची सोय फिरत्या दवाखान्यांतून करण्यात आली होती. हजारो लोकांच्यावर त्यामुळे उपचार करणे शक्य झाले. गेल्यावर्षी कोरोना काळातही रुग्णांची तपासणी आणि औषधोपचार यांची मदत केली आहे. त्यावेळीही हजारो रुग्णांना त्याचा लाभ झाला. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन यंदाही महापालिकेच्या सहकार्याने आम्ही हा उपक्रम राबवत आहोत.

आयुक्त नितीन कापडणीस म्हणाले, महापालिका क्षेत्रात दररोज दोनशेपेक्षा अधिक पॉझिटिव्ह रुग्ण आढळत आहेत. दीड हजारांहून अधिक रुग्ण गृहअलगीकरणात आहेत. प्रत्येक विभागात दीडशे ते दोनशे रुग्ण आहेत. महापालिका त्यासाठी काम करत आहे, परंतु यंत्रणा अपुरी पडते, त्यासाठी गुलाबराव पाटील हॉस्पिटल आणि पृथ्वीराज पाटील फाउंडेशन मदत करण्यास पुढे आले. त्यांची यंत्रणा खूप चांगली आहे. डॉक्टर्स नर्सेस आणि इतर स्टाफ मोठा आहे, शिवाय औषधांचे किटही ते देत आहेत. या आपत्तीत त्यांची टीम आमच्याबरोबर आहे, त्यामुळे रुग्णांच्यावर लक्ष ठेवण्यास खूप मोठी मदत होणार आहे.

या कार्यक्रमास नगरसेवक अभिजीत भोसले, आरोग्य अधिकारी डॉ. सुनील आंबोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पृथ्वीराज धनवडे, डॉ. शीतल धनवडे, गुलाबराव पाटील होमिओपॅथीकचे डॉ. जिनेश्वर एलिगोंडा, डॉ. सुहास पाटील, डॉ. संतोष भोजणे, डॉ. प्रताप भोसले, शैलेंद्र मालपे, सोनिया भोरे, प्रफुल्ला आवळे, तृप्ती कुरणे, प्रतिक्षा लोखंडे, रोहिणी मोरे, आफ्रीन मंगळवारे, बिपिन कदम, आयुब पटेल, रवि खराडे, आशिष चौधरी हे उपस्थित होते.

सुरु केलेली केंद्रे अशी, प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक १- जामवाडी शाळा नंबर २५, केंद्र क्रमांक २ वसंतदादा साखर कारखाना दत्त मंदिर केंद्र क्रमांक ३- शामराव नगर,केंद्र क्रमांक ४- त्रिमूर्ती कॉलनी, हनुमान नगर सांगली, केंद्र क्रमांक ५- विश्रामबाग, विजय कॉलनी, सांगली, केंद्र क्रमांक ६- अभयनगर बस स्टॉप मागे, सांगली, केंद्र क्रमांक ७ समतानगर, गुडविल कॉलनी, मिरज, केंद्र क्रमांक - ८ द्वारकानगर, महात्मा गांधी पोलीस चौकीजवळ मिरज, केंद्र क्रमांक ९- इंदिरानगर, मालगाव रोड मिरज, केंद्र क्रमांक १०- मिरज अर्बन सेंटर, कोल्हापूर रोड, राजेश प्लास्टिकजवळ, मिरज.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/9/1991 MIRAJ

Principal
Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.


Recognised by Govt. of Maharashtra and Central Council of Homoeopathy New Delhi, Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# सांगली शहरातील संजयनगर येथे आरोग्य शिबीर संपन्न १००० नागरिकांनी घेतला लाभ

**जिल्हा छायाचित्रकार संघ व पृथ्वीराज बाबा पाटील फाउंडेशन चा पुढाकार**



तासगाव,दि. १ (प्रतिनिधी) सांगली येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या २९५ व्या जयंती निमित्त सांगली जिल्हा छायाचित्रकार संघ व पृथ्वीराज बाबा पाटील फाउंडेशन यांच्यावतीने संजय नगर प्रभाग क्रमांक ११ मध्ये नागरिकांचे आरोग्य तपासणी करण्यात आले.एक हजार नागरिकांनी लाभ घेतला. कोरोनांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीराचे उदघाटन काँग्रेस चे सांगली जिल्हा व शहर अध्यक्ष पृथ्वीराज पाटील व संजयनगर पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक काकासो पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संजयनगर भागातील नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना रोग प्रतिकार शक्ती औषध सांगली जिल्हा छायाचित्रकार संघाचे अध्यक्ष हर्षद खाडे यांच्या हस्ते मोफत देण्यात आले.. पृथ्वीराज बाबा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग ११ मधील शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी छायाचित्रकार पत्रकार सुरेंद्र दुपटे व सांगली जिल्हा छायाचित्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हर्षद खाडे यांनी कार्यक्रम साठी पुढाकार घेतला.यावेळी प्रा.एम .बी. दुधाळ,गोरख अर्जुन.सुरेश यमगर, डॉ.विजया पाटील, डॉ.सुहास पाटील . संदिप मासाळ. सिध्दू बजबळे.गोरख अर्जुन इरफान मुल्ला .प्रताप चव्हाण . अमित पारेकर..राजू बाळीगडे.संतोष खंडागळे. वैभव सपंकाळ. इरफान मुल्ला प्रतापराव चव्हाण .डॉ. अविनाश सरगर, विनायक सरगर, डॉ.जिनेश्वर यलीगौडा, डॉ.तक्षीन बिडीवाले.डॉ.सुप्रिया बुवा.छायाचित्रकार संघाचे पदाधिकारी पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/9/1991
GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE • MIRAJ •

**Principal**
Gulabrao Patil Homoeopathic
Medical College, Miraj.

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

Ref. No. :

Date :

॥ ज्ञानमेव गुरुः ॥

GPMT
Gulabrao Patil Memorial Trust



सांगली : उपक्रमाचा शुभारंभ करताना काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, नितीन कापडणीस, अभिजित भोसले आदी.

## होम आयसोलेट रुग्णांच्या मदतीला 'पृथ्वीराज'

- डॉक्टरांसह ६१ जणांचे पथक सेवेत दाखल
- प्रभागनिहाय रुग्णांवर लक्ष ठेवणार
- फौंडेशन, मनपाचा संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी
सांगली

महापालिका क्षेत्रातील होम आयसोलेशनमधील रुग्णांच्या मदतीला अखेर 'पृथ्वीराज' फौंडेशन धावून आले आहे. गुलाबराव पाटील होमिओपॅथी कॉलेजचे डॉक्टर, शिकाऊ विद्यार्थी आणि नर्सेस हे होमयसोलेट रुग्णांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवणार आहेत. त्यासाठी फौंडेशनच्या माध्यमातून डॉक्टरांसह ६१ जणांचे पथक शुक्रवारी महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत रुग्णसेवेत' दाखल झाले. प्रभाग १८ मधील हनुमाननगर आरोग्य केंद्रात या उपक्रमाचा प्रारंभ महापौर दिग्विजय सूर्यवंशी, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, आयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

स्थानिक नगरसेवक अभिजित भोसले, वैद्यकीय आरोग्यधिकारी डॉ. सुनील आंबोळे, डॉ. पृथ्वीराज धनवडे, डॉ. शीतल धनवडे, पृथ्वीराज पाटील फौंडेशन आणि स्व. गुलाबराव पाटील होमिओपॅथी कॉलेजचे डॉ. जिनेश्वर एलिगोडा, डॉ. सुहास पाटील, डॉ. संतोष भोजगे, डॉ. प्रताप भोसले, नर्सिंग स्टाफ शैलेंद्र मालप, सोनिया मोरे, प्रफुला आवळे, तृप्ती कुरणे, प्रतीक्षा लोखंडे, रोहिणी मोरे, अश्विन मंगळवारे, विपिन कदम, रविराज खराडे आदी उपस्थित होते.

पान ६ पहा

### संकटात पुन्हा 'पृथ्वीराज'

महापूर आणि त्यानंतर आलेल्या कोरोनाच्या पहिल्या लाटेत 'पृथ्वीराज' फौंडेशनने नागरिकांना मदत केली होती. आरोग्य तपासणी, आर्सेनिक अल्बमच्या गोळ्या, मास्क, सॅनिटायझरचे वाटप केले होते. आता कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतही 'पृथ्वीराज' पुन्हा सर्वसामान्यांसाठी धावून आले आहेत. होम आयसोलेशनमध्ये असणाऱ्या रुग्णांचे हाल लक्षात घेत फौंडेशनने डॉक्टरांसह ६१ कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या सेवेत दाखल केले आहे.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No. MED/1291/910/CR/110/91 MED-7
Dt. 21/9/1991
MIRAJ.

Principal
Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.



795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# पृथ्वीराज बाबा पाटलांनी मालगावच्या गृहविलगीकरण केंद्रास दिली भेट



सांगली (प्रतिनिधी) – सांगली जिल्हा शहर काँग्रेस अध्यक्ष मा. पृथ्वीराज बाबा पाटील सातत्याने कोरोना महामारीत सांगली जिल्ह्यातील गरजूंना काँग्रेस व पृथ्वीराज पाटील फौंडेशन आणि गुलाबराव पाटील मेमोरियल हॉस्पिटल व शैक्षणिक संकुलातर्फे औषधे, मास्क वाटप, जेवण व्यवस्था कोविड मदत केंद्र इ. च्या माध्यमातून मदत करीत आहेत. आज मालगाव येथील एस. एम. हायस्कूल व ज्युनियर कॉलेज मध्ये गृहविलगीकरण केंद्रास त्यांनी भेट देऊन रुग्णांचे भोजन, निवास व औषधोपचार याची आपुलकीने विचारपूस केली व औषधे व मास्क वाटप केले. केंद्राच्या चांगल्या कामाचे त्यांनी कौतुक करुन या कामी परिश्रम करणाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी सरपंच अनिता क्षीरसागर, उपसरपंच तुषार खांडेकर, ग्रामपंचायत सदस्य कपिल कबाडगे, अजित भंडे, नीलेश सावंत, राजीव माळी, शबाना मुजावर, लक्ष्मी नाईकवाडे, गंगाधर यलपरहट्टे, झाकीर मुजावर, अशोक कबाडगे, डॉ. जिनेश्वर ऐलेगैडा, प्रशांत कबाडगे व कल्लाप्पा भंडे उपस्थित होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष असताना ग्रामीण भागातील जनतेच्या सुखदुःखात स्व. गुलाबराव पाटील अशाच भेटीगाठी करुन जनतेला दिलासा देत असत अशी प्रतिक्रिया मालगावकरांतून व्यक्त होत होती.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/8/1991
MIRAJ.

Principal
Gulabrao Patil Homoeopathic
Medical College, Miraj.

H

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

|| ज्ञानमेव गुरुः ||

GPMT
Gulabrao Patil Memorial Trust

Ref. No. :

Date :

# सांगली महापालिका क्षेत्रात गृहअलगीकरणातील रुग्णांसाठी मोफत तपासणी व औषधोपचार राज्यातील पहिला उपक्रम

## गुलाबराव पाटील हॉस्पिटल, सांगली महापालिका व पृथ्वीराज पाटील फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम

सांगली, दि. ३० (प्रतिनिधी) - कोविड काळात गृहअलगीकरणातील रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार याच्यासाठी मिरज येथील गुलाबराव पाटील हॉस्पिटल, सांगली महापालिका व पृथ्वीराज पाटील फाउंडेशन यांच्यावतीने शुक्रवारपासून संयुक्त उपक्रम सुरु करण्यात आला.

काँग्रेसचे सांगली शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, आयुक्त नितीन कापडणीस व काँग्रेसचे युवा नेते नगरसेवक अभिजीत भोसले यांच्या उपस्थितीत सांगली शहरातील त्रिमूर्ती कॉलनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

पृथ्वीराज पाटील म्हणाले, की नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रात कोरोना विरोधात प्रशासनाचा लढा सुरु आहे. त्यासाठी त्यांना मदत करण्याच्यादृष्टीने आम्ही चर्चा केली. गुलाबराव पाटील हॉस्पिटल व पृथ्वीराज पाटील फाउंडेशन यांच्यावतीने मदत करण्याची तयारी दर्शवली. सांगली व मिरज या दोन शहरातील दहा प्राथमिक आरोग्य केंद्रात या सुविधा दिल्या जाणार आहेत. त्यासाठी गुलाबराव पाटील हॉस्पिटलमधील ७० जणांची टीम कार्यरत राहणार आहे. यात २१ डॉक्टर्स, २० परिचारिका, १० सहाय्यक व काही शिकाऊ विद्यार्थी यांचा समावेश आहे.

ही टीम गृहअलगीकरण झालेल्या महापालिका क्षेत्रातील रुग्णांची घरोघरी जाऊन मोफत तपासणी व औषधोपचार करणार आहे. रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व्हिटॅमिन सी, झिंकच्या गोळ्या व आर्सेनिक अल्बम- ३० या औषधांचे कुटुंबियांसाठी होमकिट मोफत दिले जाणार आहे.



महापुरावेळी गुलाबराव पाटील हॉस्पिटल व पृथ्वीराज पाटील फाउंडेशन यांच्यावतीने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचाराची सोय फिरत्या दवाखान्यातून करण्यात आली होती. परिणामी, हजारो नागरिकांवर उपचार करणे शक्य झाले होते.

गतवर्षी कोरोना काळातही रुग्णांची तपासणी व औषधोपचार याची मदत केली आहे. त्यावेळीही हजारो रुग्णांना त्याचा लाभ झाला होता. आताही केवळ सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाच्या सहकार्याने हा उपक्रम हाती घेतला असल्याचे पृथ्वीराज पाटील यांनी सांगितले.

नितीन कापडणीस म्हणाले, की महापालिका क्षेत्रात दररोज दोनशेहून अधिक बाधित रुग्ण आढळत आहेत. सध्या दीड हजाराहून अधिक रुग्ण गृहअलगीकरणात आहेत. प्रत्येक विभागात दीडशे ते दोनशे रुग्ण आहेत. त्यासाठी महापालिकेची यंत्रणा काम करीत असली तरी ती अपुरी पडते आहे. मात्र आता गुलाबराव पाटील हॉस्पिटल व पृथ्वीराज पाटील फाउंडेशन मदत करण्यास पुढे आले. या दोन्हीही संस्थांची यंत्रणा खूप चांगली आहे. डॉक्टर्स, परिचारिका व इतर स्टाफ मोठा आहे. यांनी औषधांचे किटही त्यांनी मोफत देऊ केले आहे. या आपत्तीत त्यांची टीम आमच्यासमवेत आहे. त्यामुळे या कोरोना विरोधातील लढ्यात रुग्णांवर लक्ष ठेवण्यास खूप मोठी मदत होणार आहे.

या कार्यक्रमात दिग्विजय सूर्यवंशी व अभिजीत भोसले दोघांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. सुनील आंबोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पृथ्वीराज धनवडे, डॉ. शीतल धनवडे, गुलाबराव पाटील होमिओपॅथिकचे डॉ. [illegible], डॉ. सुहास पाटील, डॉ. संतोष भोसले, डॉ. प्रताप भोसले, शैलेंद्र माळी, सोनिया मोरे, प्रफुल्ल आवळे, तृप्ती कुलते, प्रतिक्षा लोखंडे, रोहिणी मोरे, अश्विन गंगावणे, विपिन कदम, रवी खराडे व आशिष चौधरी आदी उपस्थित होते.

### या प्राथमिक केंद्रात मिळणार सुविधा

सांगली महापालिका क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक एक- जामवाडी शाळा क्रमांक २५, केंद्र क्रमांक दोन- वसंतदादा साखर कारखाना दत्त मंदिर, केंद्र क्रमांक तीन- हनमंत नगर, केंद्र क्रमांक चार- त्रिमूर्ती कॉलनी, केंद्र क्रमांक पाच- विश्रामबाग, विजय कॉलनी, केंद्र क्रमांक सहा- अभयनगर बस स्थानकामागे (सर्व सांगली), तर केंद्र क्रमांक सात- समतानगर, केंद्र क्रमांक आठ- [illegible], महात्मा गांधी पोलीस चौकीनजीक, केंद्र क्रमांक नऊ- इंदिरानगर, माळभाग रस्ता व प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक दहा- मिरज अर्बन सेंटर, कोल्हापूर रस्ता, राजेश प्लास्टिकनजीक (सर्व मिरज).

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE • MIRAJ • R. No. MED/1291/910/ CR/110/91 MED-7 Dt. 21/8/1991

Principal
Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.

Recognised by Govt. of Maharashtra, and Central Council of Homoeopathy New Delhi, Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

# Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj

Ref. No. :

Date :

|| ज्ञानमेव गुरुः ||

GPMT
Gulabrao Patil
Memorial Trust

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास

# होम आयसोलेशन रुग्णांना दिलासा

## ▮ पृथ्वीराज पाटील फौंडेशन टीम ठेवणार वॉच ▮

जनप्रवास प्रतिनिधी

● सांगली : पृथ्वीराज पाटील फौंडेशन व स्व. गुलाबराव पाटील होमिओपॅथी कॉलेजचे डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी, नर्सेस हे आता सांगली महापालिका क्षेत्रात होमआयसोलेशनच्या रुग्णांची काळजी घेऊन त्यांच्यावर लक्ष ठेवणार आहेत. कोरोनाच्या या संकटात पृथ्वीराज पाटील फौंडेशन हे महापालिकेच्या मदतीला धावून आले आहे. डॉक्टरांची ६१ जणांची टीम या रुग्णांच्या घरी भेट देवून प्रत्यक्ष मार्गदर्शन करेल.

शुक्रवारी हनुमाननगर आरोग्य केंद्रामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात या अभियानाचा शुभारंभ मनपा आयुक्त नितीन कापडणीस आणि स्व. गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी स्थानिक नगरसेवक अभिजित भोसले, वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. सुनील आंबोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पृथ्वीराज धनवडे,

▸▸ पान ५ वर...



हनुमाननगर येथील आरोग्य केंद्रात अभियानाचा प्रातिनिधिक स्वरूपात शुभारंभ करताना आयुक्त नितीन कापडणीस, पृथ्वीराज पाटील, अभिजीत भोसले, डॉ. सुनील आंबोळे, डॉ. शीतल धनवडे, डॉ.पृथ्वीराज धनवडे आदि.

### सुरू केलेली केंद्रे...

प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक १-जामवाडी शाळा नंबर २५, केंद्र क्रमांक २ वसंतदादा साखर कारखाना दत्त मंदिर केंद्र क्रमांक ३-शामराव नगर, केंद्र क्रमांक ४-त्रिमूर्ती कॉलनी, हनुमाननगर सांगली, केंद्र क्रमांक ५-विश्रामबाग, विजय कॉलनी, सांगली, केंद्र क्रमांक ६-अभयनगर बस स्टॉप मागे, सांगली, केंद्र क्रमांक ७ समतानगर, गुडविल कॉलनी, मिरज, केंद्र क्रमांक -८ द्वारकानगर, महात्मा गांधी पोलीस चौकीजवळ मिरज, केंद्र क्रमांक ९-इंदिरानगर, मालगाव रोड मिरज, केंद्र क्रमांक १०-मिरज अर्बन सेंटर, कोल्हापूर रोड, राजेश प्लास्टिकजवळ, मिरज.

GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No.
MED/1291/910/
CR/110/91
MED-7
Dt. 21/9/1991
MIRAJ.

**Principal**
**Gulabrao Patil Homoeopathic Medical College, Miraj.**



795, Gulabrao Patil Educational Campus,
Near Govt. Milk Dairy, Miraj - 416 410.
Telephone : 0233 - 2212147 Telefax : 0233 - 2212560
Web site : www.gpmt.org
E-mail : gphmc@redifmail.com

H






GULABRAO PATIL HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
R. No.
MED/1291/910/
CR/110/91
MED-7
Dt. 21/9/1991
MIRAJ.

Principal
Gulabrao Patil Homoeopathic
Medical College, Miraj.